**कृपया प्रसिध्दीसाठी -** **16 ऑक्टोबर 2009**

## भाजपा नेते श्री. राम नाईक आणि भाजपा मुंबई अध्यक्ष व आमदार श्री. गोपाळ शेट्टी यांनी शुक्रवार, 16 ऑक्टोबर, 2009 रोजी मुंबई येथे पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन

### *मुंबईत मतदानाची टक्केवारी घसरलेली नाही - भाजपा नेत्यांचा दावा*

**मुंबई, शुक्रवार** :"मुंबईत मतदानाची टक्केवारी घसरल्याची चर्चा असली तरी त्याला मुंबईकरांची उदासिनता जबाबदार नाही, तर निवडणूक आयोगाचा हलगर्जीपणा जबाबदार आहे. मतदानाच्या टक्केवारीचे आकडे हे संख्याशास्त्राचे फसवे निष्कर्ष असून प्रत्यक्षात मुंबईकरांनीही उत्साहानेच मतदान केले आहे," असे प्रतिपादन माजी केंद्रिय मंत्री आणि भाजपाचे नेते श्री. राम नाईक व भाजपा मुंबईचे अध्यक्ष व आमदार श्री. गोपाळ शेट्टी यांनी केला आहे. मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत या दोघांनीही या दाव्या मागची कारणमीमांसा स्पष्ट केली.

खरं तर गेल्या वर्षी 2 जून 2008 रोजी श्री. राम नाईक यांनी महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी श्री. देबाशिष चक्रवर्ती यांना लक्षावधी दुबार (डुप्लीकेट) मतदारांची यादीच सादर केली होती. पूर्वीच्या बोरीवली, कांदिवली व मालाड या तीन विधानसभेतील 18,02,877 मतदारांच्या नावांची मुंबई - ठाण्यातील 40 विधानसभा मतदार संघातील नावांशी तुलना केल्यानंतर 3,80,461 म्हणजेच 21 टक्के मतदार दुबार असल्याचा धक्कादायक निष्कर्ष आल्यानंतर या संपूर्ण पाहाणीचा अहवालच श्री. राम नाईक यांनी मुख्य निवडणूक अधिका-यांना सादर केला होता. दुबार मतदार फार मोठ्या प्रमाणावर असल्याने घरोघरी प्रत्यक्ष जाऊन नवी मतदार यादी करण्यात यावी अशी मागणीही यावेळी भारतीय जनता पार्टीने निवडणूक आयोगाकडे केली होती. मालाड, कांदिवली व बोरीवलीप्रमाणेच इतरत्रही किमान 20 टक्के मतदार दुबार असल्याचे निर्दशनास आले होते. त्यामुळे मुंबईत विधानसभा निवडणुकीसाठी झालेले 46.11 टक्के मतदान खरं तर 58 टक्क्यांहून अधिक मानले पाहिजे, असा दावाही श्री. राम नाईक व श्री. शेट्टी यांनी यावेळी केला.

### दुबार नावे कशामुळे ?

दुबार मतदार नोंदणीमागे वेगवेगळी कारणे असू शकतात असे सांगून श्री. गोपाळ शेट्टी म्हणाले,"ज्याप्रमाणे अनेकदा जाणीवपूर्वक दोनदा मतदार नोंदणी होते, त्याप्रमाणे ब-याचवेळा मुंबई-ठाण्यातील विशेष परिस्थितीमुळे लोक वारंवार निवासस्थान बदलतात, घर बदलल्यावर नव्या पत्त्यावर मतदारांची नोंदणी करीत असताना त्यांची नावे जुन्या ठिकाणाहून काढण्याचे कष्ट निवडणूक कर्मचारी घेत नाहीत त्यामुळेही मोठ्या प्रमाणावर दुबार मतदार आहेत असे आमचे मत आहे." याबाबत श्री. राम नाईक यांनी नमुना म्हणून आपले जावई श्री. चंद्रशेखर कुलकर्णी यांचे नावही तीनदा आल्याचे सांगितले. वर्ष 2003 मध्ये निवासस्थान बदलल्यानंतर व त्याप्रमाणे वारंवार नोंदणी करुनही योग्य पत्त्यावर 2009 च्या मतदार यादीत प्रथमच त्यांची नावे आली, मात्र जुन्या पत्त्यावरही ही नावे कायमच आहेत, एवढेच नव्हे तर नजिकच्या इमारतीतही निवडणूक कर्मचा-यांच्या चूकीमुळे त्यांच्या नावांची नोंद केली आहे. अशी अनेक उदाहरणे दुबार नावांत आहेत.

**याद्यांचे प्रत्यक्ष पुनर्निरीक्षण आवश्यक :**

दर दहा वर्षांनी घरोघरी जाऊन याद्यांचे प्रत्यक्ष पुनर्निरीक्षण करण्याचे काम 1996 पर्यंत होत होते. तथापि, त्यानंतर संगणकामुळे नाव नोंदणी सोपी झाल्याने आलेल्या अर्जांवर कारवाई करुन पुनर्निरीक्षीत याद्या निवडणूक आयोग प्रसिध्द करु लागले. मोठ्या शहरांमध्ये बाहेरुन येणारे जसे असतात तसेच सोयीनुसार घरे बदलणारेही मोठ्या प्रमाणावर असतात. त्यामुळे प्रत्यक्ष जाऊन नोंदणी न केल्यास कधी एकाच पत्त्यावर दोन कुटुंबे, तर कधी यादीतील पत्त्यावर संबंधित मतदार नाही असे होवू लागले आहे. छोट्या शहरात किंवा खेड्यात लोक परस्परांना थेट ओळखत असल्याने व असे बदल तुरळक असल्याने दुबार नावे कमी असतात, असे मत श्री. राम नाईक व श्री. गोपाळ शेट्टी यांनी व्यक्त केले.

**मृत व स्थलांतरीत मतदार** :

प्रत्यक्ष पुनर्निरीक्षण न केल्याने ब-याचदा मृत व्यक्तींची नावेही तशीच राहातात असे निदर्शनाला आले आहे. याबाबतही श्री. राम नाईक यांनी त्यांच्या स्वतःच्या इमारतीचेच उदाहरण दिले. ते राहात असलेल्या ‘शिवस्मृती’ इमारतीत एकूण 29 मतदार यादीत आहेत. त्यापैकी पाचजणं आता हयात नाहीत तर पाचजणं स्थलांतरीत झालेले आहेत; म्हणजेच 33 टक्के मतदारांचे यादीत नाव असले, तरी ते मतदान करण्याची काहीही शक्यता नाही. मुंबईतील मतदानाची खरी टक्केवारी काढायची असेल, तर याद्यांचे प्रत्यक्ष पुनर्निरीक्षण होणे नितांत गरजेचे आहे, असे मतही श्री. गोपाळ शेट्टी व श्री. राम नाईक यांनी व्यक्त केले.

दुबार मतदार, मृत आणि स्थलांतरीत मतदारांची संख्या वगळल्यास मुंबईकर मतदानाबाबत उदासीन नाहीत हे स्पष्ट होते. वारंवार तक्रार करुनही मतदार यादीत हे दोष आहेत. सदोष मतदार यादीला जबाबदार कोण व त्यांच्यावर काय कारवाई करावयाची हे आता देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांनी मतदारांना सांगितले पाहीजे, अशी मागणीही श्री. राम नाईक व श्री. शेट्टी यांनी केली.

यासंदर्भात भारतीय जनता पार्टी, मुंबईतर्फे सविस्तर निवेदन देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त श्री. नवीन चावला यांना सादर करण्यात आले आहे. श्री. चावला यांचे सहकारी उपायुक्त श्री. जय पी. प्रकाश तसेच महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी श्री. देबाशिष चक्रवर्ती यांनाही ही माहिती दिली आहे. निवडणूक आयोगाने मतदार याद्यांचे घरोघर जाऊन विशेष पुनर्निरीक्षण केल्यास मुंबईच्या मतदारांनीही महाराष्ट्रातील इतर मतदारांप्रमाणेच उत्साहाने मतदान केल्याचे स्पष्ट होईल. सदोष याद्यांमुळे राजकीय कार्यकर्त्यांनाही सर्वसाधारणपणे 20 टक्के मतदार सापडतच नाहीत. त्यामुळे अनेकांना त्यांचे नाव आहे किंवा नाही हेही न कळल्याने ते मतदानाला येत नाहीत. ही उणीवही विशेष पुनर्निरीक्षणाने दूर होईल असेही श्री. नाईक व श्री. शेट्टी म्हणाले.

मुंबईकरांचीही लोकशाहीवर श्रध्दा आहे. म्हणूनच "मतदानाच्या दिवशी मुंबईकरांनी सुट्टी घेतली, ते निरुत्साही आहेत" अशा प्रकारचे निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. निवडणूक आयोगाने फुगलेल्या मतदार याद्या सर्वेक्षण करुन नव्याने तयार कराव्यात, अशी मागणीही श्री. राम नाईक व श्री. गोपाळ शेट्टी यांनी केली.

**(कार्यालय सचिव)**